PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 1, ISSUE 4

# सुनील अभिमान अवचार यांच्या जागतिकीकरणातील कवितेतील प्रतीक योजना

**डॉ. गजानन मुंधे**
सहयोगी प्राध्यापक
अप्पास्वामी महविद्यालय, शेंदुजना (आढाव)
महाराष्ट्र भारत

प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची जीवन जाणीवा मांडणारी सुनील अभिमान अवचार यांच्या ' ग्लोबल वर्तमानाच्या कविता ; मातृसत्तेच्या कविता, मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणार नाही. ब्राव्हो | फॉक्स माइन्डस् ऑफ कॅपीटॅलिस्टस्; इत्यादी कवितेतील निवडक कवितांच्या निमित्ताने प्रतीक योजना (SYMBOL) ची मांडणी करायची आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया जगभर सुरु झाली आहे. त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक राजकीय परिणाम होत आहे. सर्वहाराच्या जीवनजगण्याचे प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे सामजिक न्यायाचा विचार करणारे कलावंत, कवी सुनील अभिमान अवचार आपली संवेदनशीलता व्यक्त करताना दिसतात. जागतिकीकारणामुळे सुंदर, स्वतंत्र मानवी जीवनाला जी कुरूपता येणार आहे त्याविषयीची अस्वस्थता कवी सुनील अभिमान अवचार आपल्या काव्य साहिंतेतून व्यक्त करतात.

जागतिकीकरणानातील नवी नवी प्रतीके सुनील अभिमान अवचार आपल्या कवितेतून सांगतात आणि आपल्या जीवनसंघर्षातील एक नवी प्रतीक योजना मांडतात.

प्रतिक म्हणजे काय? याचा आपण प्रारंभी विचार करू साधारपणे प्रतीक (SYMBO) म्हणजे “व्यक्तिनिष्ठ अनुभवाचे प्रातिनिधिक अनुभवाशी असलेले नाते साधण्यासाठी वाङ्मयीन संज्ञापण व्यापारात वापरले जाणारे चिन्ह म्हणजे प्रतीक. प्रतीकरूप वास्तूतील गुणधर्म मानवी अनुभवाच्या विशिष्ट गुणधर्माचे प्रतिनिधित्व करतात, त्यामुळे त्या चिन्हाला

प्रतीक चे स्थान प्राप्त होते. उदाहरणार्थ, 'पांढरा गुलाब' ही वस्तू जेव्हा वाङ्मयीन संज्ञापणात ' मानवी निष्ठेच्या गुणधर्मांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी योजिली जाते, त्या वेळी 'पांढरा गुलाब' हे वाङ्मयीन प्रतीक म्हणून जन्माला येते. प्रतीकामागील अनुभव सर्वपरिचित असतो. व्यक्तिगत अनुभवाला सार्वत्रिकतेचे परिमाण लाभण्यासाठी किवा व्यक्तिनिष्ठ अनुभवाचे साधारणीकरण करण्यासाठी प्रतीकांची योजना केली जाते."

सुनील अभिमान अवचार यांनी ही अशाच प्रकारची प्रतीक योजना केली आहे. '' व्युत्पत्तीदृष्ट्या 'सिम्बॉल' या शब्दाच्या मूळ ग्रीक रूपाचा अर्थ ' एकत्र प्रक्षेपित करणे' असा आहे. त्यामुळे एकरूपकत्त्व हे प्रतीकाचे महत्वाचे लक्षण ठरते. प्रतीकेय आशय (आडिया) आणि प्रतीकरूप वस्तू (ऑब्जेक्ट) यांच्यातील गुणधर्मसाम्याची एकरूपता हे प्रतीकाचे वैशिष्ट्ये असते. त्यामुळे प्रतीकाची रचना काहीशी रूपकासारखी असते. मात्र रूपकाप्रमाणे प्रतीक हे विश्लेषिता येत नाही. संश्लेषकता हाच प्रतीकांचा धर्म असतो. केवळ बिंबप्रतीबिंब भावासारखे त्यांचे स्वरूप नसते. रूपकात प्रकट आणि अध्याव्त अर्थ सहजगम्य असतात. लोककथामध्ये कोल्हा, लांगडां,बैल, कावळा अशी प्राणीसृष्टी रूपकात्मक अर्थाने योजलेली असते. ही रूपके सहज उलगडणारी असतात. प्रतीकांची भाषा मात्र काहीशी संदिग्ध आणि निसरडी असते. प्रतीके मुळात , 'प्रतिमाच' असतात. त्यांचे विकसित साधारणीभूत अर्थ होऊन अवतरलेले रूप म्हणजे प्रतीक, त्यामुळे प्रतीक हे प्रतिमेइतके भाव व्यंजक किवा भावनेने भारलेले नसते. त्यात काहीशी बुद्धीगम्यता असते. उदाहरणार्थ ' झाड " हे कवीच्या सर्जनशीलतेचे प्रतीक म्हणून कवितेत येते तेव्हा झाडाची पाने, फुले, मोहर येणे, हे गुणधर्म आणि कवीची सर्जनशीलता या गुणधर्मांची आंतरिक तुलना होऊन प्रतीक वस्तू आणि प्रतीके, आशय यांचे गुणधर्म एकमेकांवर प्रक्षेपित होतात. व झाड ह्या वाङ्मयीन प्रतीकाचा जन्म होतो. अर्थात येथे प्रतीक वस्तू ज्या प्रतीकेय आशयाचा निर्देश करते तो आशय प्रतीकेय वस्तुपेक्षा महत्त्वाचा असतो. तो काहीसा बुद्धीगम्य असतो. "२ सुनील अभिमान अवचार यांच्या कवितेतील प्रतीकांचा विचार करतना वरील बाबीचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. 'ब्राव्हो | फॉक्स माइन्डस् ऑफ कॅपीटॅलिस्टस् या कवितेत ' फॉक्स' हे रूपक येते. फॉक्स म्हणेजे 'कोल्हा' कोल्हा हे चतुरतेचे प्रतीक आहे. हे प्रतीक साम्राज्य शाहीच्या चतुरतेचे प्रतीक आहे. 'CYBORGBOY' हे प्रतीक आधुनिक मानवीय मेंदूचे प्रतीक म्हणून येते. सुनील अभिमान अवचार यांनी हे प्रतीक व्यवस्थेच्या फेव्हरचे प्रतीक म्हणून उपरोधाने वापरले आहे. सुनील

अभिमान अवचार यांनी तर आतपर्यंत मराठी साहित्यविश्वाला माहित नवते असे नवे प्रतीक विश्व तयार केले आहे.

'माइन्डस् कॅपीटॅलिस्टस्' हे प्रतीक सुनील अभिमान अवचार यांचं कवितेत उपरोधि अंगाने शोषकांचे प्रतीक म्हणून येते. हा माइन्ड जागतिकरणाच्या फायद्याची आणि जणू काही तो जागतिकीकरणाच्या फेवरचा 'अम्बेसिडर' असल्याची नोंद कवी कताना दिसतो. त्या कवितेचा काही अंश आपण पाहु म्हणजे हे अधिक स्पष्ट होईल.

"माइन्डस् कॅपीटॅलिस्टस् तुम्हाला समजतो मार्केट ..... / हा माइन्ड तुमच्या कडे पाहिल उर्मटपणे / जेव्हा तुम्ही एखाद्या भिकाऱ्याच्या हातावर टेकवाल दमडी/ तो सुमोची कुस्ती पाहताना ..../ WWF ची फाइट रंगली असतांना..... /दोन उपाशी माणसं भाकरीसाठी आपसात लढताना... त्याला हवे असते फक्त अधिकाधिक काम कामगाराकडून / आपल्या टार्गेटसाठी करायचे असते माणसाचे जत्थे मॅनेज

हा माइन्ड दहशत निर्माण करतो आणि पाहिजे ते करून घेतो..../ हा माइन्ड अपघात झालेल्या कामगाराच्या हाताला बँडेज बांधताना दिसत. /नाही/ या माइन्डणे केले आहेत. नियंत्रित रणगाडे - मिसाईल्स / जिंवंत माणसे पपेटसारखे झाले आहे. त्याच्या हातातील हालचालीवर नियंत्रित / बाहेर मुसळधार पाऊस पडत असला की, ते येतात समकालीन आर्ट / पाहण्यासाठी म्युझिक यांना हवे आहे जॉक्शनच्या धुंदीतले / त्यांच्या सेक्सची टेस्ट झाली आहे. मल्टी / ते सहज घेऊ शकतात कोणत्याही देशातील मुलीचे कौमार्य लिलावात / फॅशन-विक हा त्यांचा चर्चेचा विषय असतो..... / जगातल्या श्रीमंताच्या यादीत आल्यावर ते करणार आहेत म्हणे एड्सग्रस्तांसाठी / चॅरीटी फंड घोषित / पेज -३ वर सारेच प्रिंट होते त्यांच्या विषयी / ते माणसापेक्षा शेफर्डस, बुलवर जास्त प्रेम करतात. / तुम्ही फक्त साक्षीदार व्हा त्यंच्या जल्लोषाचे /तो म्हणतो : जागतिकीकरणाचे किती फायद. महानगरपालिकेच्या शाळेतील विध्यार्थ्यांना मोफत कपडे / दोन टाइमची भेटते खिचडी, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, शेतीसाठी पॅकेज,/ दलित वस्त्यामध्ये- वाल्मिकी आंबेडकर स्कीम / पंचायत समितीतून जोडी-बंडी, सर्व जगाची माहिती खेड्यापाड्यात / महिला समक्षीकरण, वृद्धांना इंदीरा आवास योजना / असा त्यांचा ब्लाईन्ड अम्बेसिडर चौकात उभा आहे प्रचार करीत"

(ब्राव्हो फॉक्स माइन्डस् कॅपीटॅलिस्टस्, प्र. कृ. २१)

सुनील, अभिमान अवचार यांनी ह्या प्रतीकाचे नवे नवे पैलू उकलून हे प्रतिक कसे तुमच्या विरोधात आहे म्हणजे मानवी कल्याणाच्या कसे विरोधात आहे त्याचे ठाशीवपण किवा गर्द्पणा कविता जशी जशी पुढे सरकते तसे तसे त्या प्रतीकांचे मानव्य विरोधी रूप अधिक स्पष्ट होत जाते.

सुनील अभिमान अवचार यांच्या कवितेतील प्रतीकाविषयी प्रभाकर गंभीर लक्ष वेधतात. ते म्हणतात 'करून डोळे' हे प्रतीक मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणार नाही..... ' या कवितेतील आहे. सुनील अभिमान अवचार म्हणतात.

'मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणार नाही
माझ्या त्या निष्ठेची उंची मोजण्यासाठी त्यांच्याजवळ नाही टेप
माझ्या करूण डोळ्यांना ते कोणत्या तागड्यात मोजणार आहेत?'

(प्र.क्र १३)

या कवितेत आकलन मांडताना गंभीर म्हणतात की, "या कविच्या कवितेतील हा राजकीय उद्‌गार 'कॉमन मन' च्या वतीचा असून त्यंच्या आदिम नैतिक पाया (इथीकलबेस) वर्तमान स्तिथीतही तोलून धरणारा आहे. या ठिकाणी योजलेली 'करून डोळे' हे प्रतीक बुद्धाच्या शोषणमुक्त वैश्विक मानव्याला उजागर करते आणि 'कोणत्या तागड्यात मोजणार आहेत? या सवालाने वर्तमान शोषणसत्ता जरी असली तरी मानव्यासाठी मात्र पांगळी आहे असे उप्रोधीक्तेने ध्वनित करते."३ तात्पर्य सुनील अभिमान अवचार यांच्या अनेक कवितानत 'गांर्णिका', ब्रॅन्डअम्बेसिडर, किंकाळी, कटोरा, ROBOSAPION' इत्यादी प्रतीकामधून साम्राज्यशाहीच्या विरोधातील तीव्र भाव प्रतिध्वनित होताना दिसतो.

'काही प्रतीके सांकेतिक असतात. गणितातील चिन्हे किवा काही धार्मिक प्रतीके गटात मोडतात. ही प्रतीके रूढ व सर्वसंमत असतात. + x ह्या चिन्हांना किवा धर्मात क्रूस, स्वस्तिक अशा चिन्हांना रूढ व सर्वसंमत अर्थ लाभलेला असतो. काही प्रतीके प्रासंगिक असतात. उद्योगव्यवसायातील बोधचिन्हे, संस्थाच्या ध्येय धोरणाची चिन्हे ह्या प्रकारात येतात. प्रतीक वस्तू आणि प्रतीकेय आशय यातील सबंध सांकेतिक व योगायोगाचा असतो. संतती नियमांचे चिन्ह म्हणून येणारा तांबडा त्रिकोण हे याचे उदाहरण सांगता येईल."४

सुनील अभिमान अवचार यांच्या कवितेत चिन्हाची मालिका आपणाला पाहायला मिळेल. ' मातृसात्येच्या कविता' मधील 'बिम्बो....... ruok? या कवितेत या दृष्टीकोनातून

महत्वाची आहे. :- ) किवा :- *' हे चिन्ह अलीकडील ई-चाटिंगची सांकेतिक भाषा आहे आणि ही भाषा जे कोणी इंटरनेटचा वापर करत असतील त्यांना ती सहज आकलनातील असते. ही चिन्हे भाषेत नव्याने आल्याने सुनील अभिमान अवचार यांनी वापरल्याने समकालीन अर्थ सहज समजण्यास उपयुक्त होतो. (' :- )या चिन्हांना अर्थ ' आनंद' आणि '*' या चिन्हांचा अर्थ कीस आपल्या मराठीत सांगयचे तर 'मुका' असा होतो. ही दोन्ही किवा यासारखी संकेत प्रतीके वैश्विक स्वरुपाची आहेत. संस्कृतीतील अनुभवाची सार्वत्रीकता ह्या संकेतप्रतिकामध्ये गोठलेल्या स्वरुपात अंगभूत असते. "त्या त्या भाषेतील वाङ्मय परंपरेत प्रतीकांची एक परंपरा नांदत आहे. या परंपरेतील प्रतीकांचा नवार्थबोधक उपयोग करून साहित्यिक आपल्या व्यक्तिगत अनुभूतीला साधारणिकृत पातळीवर आणतो."५

पुन्हा सुनील अभिमान अवचार यांच्या 'गर्णिका' आणि 'ब्रँडअम्बेसिडर' ह्या दोन प्रतीकांचा विचार करता येईल. 'गार्णिका' हे पिकासोचे चित्र आहे. दुसरया महायुद्धानंतर झालेली मानवीय समाजाची उद्ध्वस्थता ते चित्र मांडते. सुनील अवचार यांनी तोच आशय घेऊन 'गार्निकाच्या' निमित्ताने नव्या मानवीय जीवनाच्या संदर्भात किती भयावह स्थिती जागतिकीकारणाने उभी केली आहे. ते ह्या प्रतीकांच्या माध्येमातून सांगितले आहे -

'मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन / उभा राहणार नाही...../ माझ्या निष्ठेची उंची मोजण्यासाठी / त्यांच्या जवळ नाही टेप / माझ्या करून डोळ्यांना ते कोणत्या तागड्यात / मोजणार आहेत..... /मी त्यांचा प्रोग्राम होणार नाही / नाही मोल्ड होणार त्यंच्या इच्छेनुसार /मी माझ्या उंच मानेसाठी फेकू शकतो / अंगावरचे महावस्त्र / मला कारखाण्याच्य दुषित पाण्या प्रमाणे / बाहेर पडायचे नाही मेन होलमधून / तुमच्या माणुसकीची दुप्लीकेत नोट / खुशाल चालवा मॉलमधील बेगडी बाजारात...... / मी डस्टबीन नाही तुमच्या करपलेल्या निष्टांचा / अरे मी कोणत्याही पॅकेज शिवाय / जमिनीवरून धावू शकतो / तुमच्या जीवघेण्या स्पर्धेचे ऑलम्पिक / मी खुशाल जिंकू शकतो'

(गार्णिका' पृ. क्र. ३०)

मानवी जीवनाच्या मरणकळाचे प्रतीकामधून अवचार या ठिकाणी '२०५० ची गार्निका' मधून मांडतात. 'ब्रँडअम्बेसिडर' या प्रतिकामधून अवचार यांनी ब्रँडचा खोटा चेहरा तर स्पष्ट केलाच त्या बरोबर 'ब्रँडअम्बेसिडर' हे कवितेत प्रतिक वापरून आजच्या समकालीन जीवनाचे

भावविश्व या प्रतीकामधून मांडले आहे. हा ब्रँडअम्बेसिडर बेगडी,पेज- थ्री' जीवनशैलीचा साक्षीदार आहे.

थोडक्यात सुनील अभिमान अवचार यांनी सांकेतिक व प्रासंगिक प्रतीकाखेरीज काही प्रतीके वैश्विक प्रतीक म्हणून वापरली आहेत. उदा. 'गार्निक, करून डोळे इत्यादी सुनील अवचार यांनी प्रतीकांचा नवार्थबोधक उपयोग करून जागतिकीकरणाच्या कवितेला नवे पैलू बहाल केले आहे. मराठीमधील प्रतीक योजणेमध्ये सुनील अवचार यांची प्रतीक योजना महत्वाची ठरेल यामध्ये काही दुमत नाही.

## संदर्भग्रंथ:

१ वाङ्मयीन संज्ञा- संकल्पना कोश : वसंत आबाजी डहाके / प्रभा गणोरकर, भ. रा. भटकळ फाउंडेशन, पुणे.
२ ग्लोबल वर्तमानाच्य कविता- सुनील अभिमान अवचार, दत्ता प्रकाशन अमरावती, २००४
३ मातृसतेच्या कविता- सुनील अभिमान अवचार देवयानी प्रकाशन, मुंबई,२०११
४ ब्राव्हो| फॉक्स माइन्डस् कॅपीटॅलिस्टस् - सुनील अवचार, गौरव प्रकाशन, औरंगाबाद, २०१०
५ मी सत्येच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणार नाही. - सुनील अभिमान अवचार, गौरव प्रकाशन औरंगाबाद,२०१०